**नियमित दिवाणी दावा क्र.३०६/२०२२ नि.५ वरील आदेश**
**राजाराम पाटील वि. विजय पाटील व इतर**
**सीएनआर नं.MHKO050029282022**

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादींविरुध्द त्यांनी दाव्याच्या अंतीम निकालापावेतो दावा मिळकत (अर्ज परिच्छेद १ मध्ये नमुद) बाबत कोणताही खरेदी–विक्री व्यवहार करु नये अथवा त्यामध्ये त्रयस्थ इसमांचे हितसंबंध निर्माण करु नयेत असा तुर्तातुर्त मनाई आदेश होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** दाव्याचे समन्स व प्रस्तुत अर्जाची नोटीस लागु होऊनही प्रतिवादी क्रं. १, २ व ७ ते ९ हे दाव्याचे कामी हजर झाले नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा दावा व अर्ज नि.५ त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालवण्यात आला. प्रतिवादी क्रं. ३ ते ६ तर्फे नि.१४ कडे दाव्यास कैफीयत देऊन दाव्यातील मजकुर नाकारण्यात आला. तसेच, प्रतिवादी क्रं.३ ते ६ तर्फे त्यांनी कोणत्याही प्रकारचा खरेदीपुर्व विक्री करार केला नसल्याचे कथन करण्यात आले.

**३.** अर्ज, प्रतिवादी क्रं.३ ते ६ यांची दाव्यास कैफीयत, प्रकरणातील कागदपत्रे पाहिल्यानंतर आणि दोन्ही बाजुचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावर मी कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतो काय ? | होय. |
| २. | सोयीस्करतेची तुला वादीच्या बाजुने आहे असे तो सिध्द करतो काय ? | होय. |
| ३. | मागणी केल्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतो काय ? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**४.** वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दावा मिळकत ही मुळची वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ६ यांची वडीलार्जीत मिळकत असुन सदर दावा मिळकतीबाबत रे.क.नं.२९७/१२ मध्ये तडजोडीने वाटणी होऊन वादीस दावा मिळकतीपैकी १/२ हिस्सा प्राप्त झालेला आहे. तथापी, त्या अनुषंगाने अद्याप महसुल दप्तरी नोंदी झालेल्या नाहीत. सदरची दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्रं. १ ते ६ यांची सामाईक मिळकत असतानाही प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी वादीचा हक्क लपवुन दावा मिळकत प्रतिवादी क्रं. ७ यास वादीच्या अपरोक्ष परस्पर विक्री करण्याकरता खरेदीपुर्व विक्री करार करुन त्यानुसार विक्री रक्कम स्विकारली आहे. प्रस्तुतचा प्रतिवादींनी दाव्याच्या अंतीम निकालापर्यंत खरेदीपुर्व कराराआधारे वादीच्या हिश्याची मिळकत त्याच्या संमतीशिवाय परस्पर विक्री, हस्तांतर करु नये अथवा त्यावर कर्जबोजा अथवा त्रयस्थ इसमाचे हक्कसंबंध निर्माण करु नयेत अशी तुतातुर्त मनाईचा मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

**५.** प्रतिवादी क्रं.१ व २ तर्फे प्रस्तुत अर्जाचे कामी कोणीही हजर होऊन युक्तीवाद केला नाही. सबब, सदरचा अर्ज त्यांच्या युक्तीवादाविना चालवण्यात आला.

**६.** प्रतिवादी क्रं.३ ते ६ तर्फे सदरची दावा मिळकत ही अद्यापही समाईकात असुन त्यांनी कोणत्याही प्रकारचे खरेदीपुर्व विक्री करारपत्र केलेले नाही, तसेच त्यांना दावा मिळकत विक्री करावयाची नाही आणि वादीच्या अर्जातील संपुर्ण मजकुर हा खोटा असुन तो चालण्यास पात्र नाही असा युक्तीवाद करण्यात येऊन वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

### मुद्दा क्र. १ ते ३ करिता

**६.** सदर तिनही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी ते एकत्रीत विचारार्थ घेत आहे. वादीतर्फे असे कथन करण्यात आले की, दावा मिळकत ही त्याची व प्रतिवादी क्रं.१ ते ६ यांची वडीलार्जीत मिळकत आहे व त्याबाबत झालेल्या तडजोडीनुसार त्यास दावा मिळकतीपैकी १/२ हिस्सा आला आहे.

**७.** अभिलेखावर दाखल असणा–या नि.३/१ वरील दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी आणि प्रतिवादी क्रं. १ ते ६ यांची नावे सामाईक क्षेत्र सदरी नोंद असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/२ व ३/३ कडील रे.क.नं.२९७/१२ मधील तडजोड पुरसीस व तडजोड हुकूमनाम्याचे अवलोकन केले असता त्यावरुन वादीस दावा मिळकतीपैकी १/३० हिस्सा वाटणीस आला असुन दावा मिळकतीमधुन वहिवाटीकरता सामाईकात रस्ता ठेवण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/४ कडील करारपत्राच्या छायांकीत प्रतीचे अवलोकन केले असता त्यावरुन प्रतिवादी क्रं.१, २ व ६ यांच्या दरम्यान दावा मिळकतीसंदर्भात व्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/५ ते ३/८ कडील नोटीस स्थळप्रत व पोष्ट दस्तऐवजांवरुन वादीने प्रतिवादी क्रं.१, २ व ७ यांना उपरोक्त नमुद करारपत्रानुसार कोणताही व्यवहार करु नये अशा आशयाची सुचना दिल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/९ कडील जाहीर नोटीसवरुनही वादीने सदर करारपत्राच्या अनुषंगाने कोणताही व्यवहार करु नये अशी जाहिर नोटीस दिल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. नि.३/१० व ३/११ कडील एन.सी.अहवाल आणि नि.१६/१ व १६/२ च्या दस्तऐवजावरुन वादी व प्रतिवादींदरम्यान दावा मिळकतीच्या अनुषंगाने परस्परविरोधी वाद असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्याप्रमाणे कैफीयत नि. १४ वरुन दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ६ यांची वडीलार्जीत मिळकत असुन ती सामाईक वहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. प्रतिवादी क्रं.१, २ व ७ ते ९ यांनी वादीच्या हिश्याबाबतचे कथन खोडुन काढण्याकरता कोणताही पुरावा सादर केलेला नाही. किंबहुना त्यांनी दाव्याचे कामी हजर होऊन दाव्यास विरोध केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी वादीने दावा मिळकत त्याच्यासह प्रतिवादी क्रं.१ ते ६ यांना दावा मिळकतीत सामाईक हिस्सा प्राप्त झाल्याचे प्रथमदर्शनी शाबीत केले आहे. प्रतिवादींतर्फे वादीच्या विरोधी असा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे या प्राथमिक क्षणी वादीने दावा मिळकतीवरील आपला समान हिस्सा असुन तो प्रतिवादी क्रं.१ ते ६ सह दावा मिळकतीच्या वहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द

केले आहे. त्यामुळे वादीने त्याला प्रथमदर्शनी केस असल्याचे तसेच वादीच्या बाजुने सोयीस्करतेचा तोल असल्याचे या प्राथमिक क्षणी शाबीत केलेले आहे.

**६.** प्रस्तुत दाव्यातील संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा कायम मनाई आदेश मिळण्याकरता दाखल केलेला आहे. वादी प्रतिवादींचे दावा मिळकतीमधील असणारे हक्क व अधिकार सिध्द होण्यासाठी दावा गुणदोषावर चालणे व दोन्ही बाजूंचा पुरावा पटलावर येणे गरजेचे आहे. त्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. या प्राथमिक क्षणी वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादी क्रं. १ व २ हे दावा मिळकत विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे तसेच दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने मागणी केलेली दाद ही केवळ प्रतिवादी क्रं.१, २ व ७ यांच्यादरम्यानच्या व्यवहाराच्या अनुषंगाने असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे केवळ प्रतिवादी क्रं.१, २ व ७ यांचेविरुध्द दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीवर त्रयस्थ इसमांचे हितसंबंध निर्माण करण्यात येऊ नये अशी तुर्तातुर्त मनाई देणे योग्य ठरेल. सबब मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो

२. प्रतिवादी क्रं.१, २ व ७ यांनी दाव्याचा अंतीम निकाल लागेतोपर्यंत दावा मिळकतीबाबत कोणताही खरेदी विक्री व्यवहार करु नये अगर त्रयस्थ इसमांचे हितसंबंध निर्माण करु नयेत.

३. प्रतिवादी क्रं.३ ते ६ आणि ८ व ९ विरुध्दची मागणी फेटाळण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SHASHANK SURESH PEDNEKAR
Date: 2023.01.04 15:14:02 +0530

इचलकरंजी
दिनांक –०४.०१.२०२३

**(एस. एस. पेडणेकर)**
**६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**इचलकरंजी.**